# नाम साधनेने ईश्वर प्राप्तीचा मार्ग सुखकर होतो-प.पू.दिढे मामा



**साहसिक वृत्त / १० जुलै**

**खामगांव :** श्री ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज परिवाराच्या वतीने आशिर्वाद मुर्ती प.पू.दिढे मामा यांच्या चिखली रोडवरील नामालय आश्रम येथे दि.०८ ते ०९ जुलै २०२३ रोजी गुरुपोर्णिमा सोहळा आयोजित करण्यात आले होते. प.पू.दिढे मामा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गुरुपोर्णिमा सोहळयानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. यामध्ये दि.०८ जुलै २०२३ रोजी महाराजांचे आगमन, पादुका पुजन व उपासना करण्यात आली. सायंकाळी ७ वाजता सांगली येथील डॉ. भालचंद्र जोषी यांचे किर्तन पार पडले. रविवार दि.०९ जुलै २०२३ रोजी सकाळी ६ वाजता काकडा आरती, सकाळी ७ वाजता सामुहिक जप, सकाळी ९.३० वाजता धर्मभूषण श्री.गजानन दादा शास्त्री यांचे प्रवचन पार पडले. गुरुपुजन, आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. तद्नंतर सायंकाळी ४ वाजेपासुन सामुहिक उपासना व आरतीने दोन दिवसीय गुरुपोर्णिमा उत्सवाची सांगता झाली.

याप्रसंगी प.पू.दिढे मामा यांनी आशिर्वादपर प्रवचनात सांगितले की, नाम साधनेने ईष्वर प्राप्तीचा मार्ग सुखकर होतो म्हणून नामस्मरण सतत केले पाहिजे. नामामुळे अध्यात्मिक उन्नती जलद होते. नामामुळे सद्गुरुंजी प्राप्ती होते. तसेच भगवंताषी एकरुप होता येते व अद्वैत साधल्या जाते. ईश्वराच्या नामस्मरणाने मानव ईश्वराषी एकरुप होवु शकतो. अहंम नष्ट होवुन अनेकविध लाभ होतात असे त्यांनी सांगितले. यावेळी मा.आमदार राणा दिलीपकुमार सानंदा, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्याम उमाळकर यांच्यासह शेकडो भाविकांनी प.पू.गोंदवलेकर महाराजांच्या प्रतिमेचे व पादुकांचे पुजन करुन दर्शन घेतले. तसेच याप्रसंगी प.पू.दिढे मामा व श्री गजानदादा शास्त्री यांचे मा.आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी शाल, श्रीफळ व पुष्पहार घालुन स्वागत केले. याप्रसंगी ब्रम्हचैतन्य परिवाराचे सर्वश्री अभय दिढे, सौ.छाया दिढे, सौ.प्रतिभा पाटील, ऋशी दिढे, महाराष्ट्र ब्राम्हण सभेचे अध्यक्ष ॲड. शेखर जोशी, ॲड. उदय आपटे, डॉ.अरविंद पाटील, डॉ.सुश्रृत झाल्टे, नितीन तिडोळे, उदय शुक्ला, आषिश सराफ, प्रतिक जोशी, सचिन पाठक, मनोज जोशी राम जोशी, हेमंत खेकाळे, ॲड.कुणाल खानझोडे, सचिन संत, शेखर कुळकर्णी, मिलींद सराफ, श्रीवल्लभ देशपांडे, स्वप्नील देशमुख, सुनिल आकनकर, राजु खर्चे, अजय मोरे, मयुर शर्मा, सुनिल जोशी, वैद्य काका, सुरेष घोडेराव, अनिलमामा दाळवाले, वैभव शास्त्री, अक्षय भालेराव, अमोल सराफ, अजय सराफ, दुर्गासिंग ठाकुर, पप्पुदादा वानखडे,पवन व्यास, डॉ.राजदेरकर, प्रविण देशमुख, शेखर जोशी मेहकर,मनिश सकळकळे, वाडीचे सरपंच विनोद मिरगे, खामगाव शहर कॉंग्रेस कामिटीच्या अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने, सौ.सुजाता शर्मा,सौ. मिना खर्चे, सौ.मिनल सकळकळे, सौ.अनुराधा मोरे,सौ.मिना वानखडे, सौ.कोमल आकनकर, सौ.साक्षी आकनकर, सौ.निषा बोराडे, सौ.गितांजली देशमुख यांच्यासह संपुर्ण राज्यातून भाविक भक्त उपस्थित होते.

यावेळी आयोजित महाप्रसादाचा शेकडो भाविकांनी लाभ घेतला. गुरुपोर्णिमा सोहळा यशस्वी करण्यासाठी ब्रम्हचैतन्य परिवार व नामालय आश्रमच्या पदाधिकारी व सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले.

*** नामालय आश्रम येथे गुरुपोर्णिमा सोहळा उत्साहात साजरा**
*** माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी घेतले दर्शन**

## धर्मसेवा प्रतिष्ठान न्यासातर्फे वृक्षारोपण संपन्न




**साहसिक वृत्त / १० जुलै**

**वर्धा :** समाजसाहाय्य, राष्ट्ररक्षण आणि धर्मजागृती यांसाठी कार्यरत धर्मसेवा प्रतिष्ठान या न्यासातर्फे सोमवार दिनांक १० जुलै २०२३ रोजी श्री विठ्ठल रुख्मिणी व संत सावता माळी मंदिर, बोरगाव (मेघे) येथे वृक्षारोपण करण्यात आले. धर्मसेवा प्रतिष्ठान न्यासातर्फे गरजूंना कपडे वाटप, विनामुल्य वैद्यकीय तपासणी, नैतिकमूल्य संवर्धन कसे करावे , ताणतणाव मुक्त जीवन कसे जगावे याविषयी प्रबोधन, असे विविध समाजोपयोगी उपक्रम घेण्यात येतात.

भावी काळात वृक्षांच्या लागवडीची गरज, वृक्षारोपणाचे महत्त्व या उद्देशाने हे उपक्रम घेण्यात आले . हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी न्यासाच्या वतीने सौ.नंदा विलायतकर, सौ. ललिता पाटील,सौ वनिता हिंगेड यांनी परिश्रम घेतले.

या उपक्रमासाठी ह.भ.प. सौ. लताताई तिवारी, सौ. बेबीताई ठोंबरे, सौ.शशीकला भोयर, श्रीमती रंजना गेडाम, श्री. राम ठोंबरे, श्री.अरूण नाचनकर, श्री.मनोहरराव वाळके, श्री.तेजस भोयर व मंदिरातील सर्व सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## चित्रपट अभिनेते श्री विजय गोखले यांची विद्यापीठातील प्रादर्शिक कला विभागाला सदिच्छा भेट




**साहसिक वृत्त / १० जुलै**

**अमरावती :** रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, मुंबईचे (सेन्सॉर बोर्ड) अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध मराठी व हिंदी चित्रपट अभिनेते श्री विजय गोखले यांनी नुकतीच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रादर्शिक कला विभागाला सदिच्छा भेट दिली. श्री गोखले म्हणाले, माझे वडील विद्याधर गोखल यांचं जन्मस्थळ आणि शालेय शिक्षण हे अमरावतीचेच. ते दैनिक लोकसत्ताचे संपादक होते आणि आज मला या अमरावतीमध्ये येण्याचा योग आला, हे खरोखर मी माझे भाग्य समजतो.

इतर ठिकाणी हरकती घेतल्या जातात, मात्र संगीतात हरकती घेतल्या तर ते गवय्याच्या तयारीचे लक्षण दिसतं. खटके इतर ठिकाणी खटकतात, मात्र संगीतामध्य जागोजागी खटक्यानीच गीत रोमांचक होतं. १० विद्यार्थ्यांची टिम असली की त्या १० विद्यार्थ्यांचे मनोबल किती मजबूत होतं, ते काय जादू करु शकतात, हे तुम्ही दाखवून द्याल, याची मला निश्चित खात्री आहे, असे सांगून त्यांनी प्रादर्शिक कला विभागाने अल्पावधीत केलेले कार्य आणि विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिलेल्या सर्व सोयी-सुविधा पाहून आनंद व्यक्त केला. तसेच या विभागाच्या भविष्यातील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्यात.

याप्रसंगी रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री विजय गोखले व सांस्कृतिक कार्य संचलनालय, मुंबईचे सचिव श्री खामकर यांचा विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. आजच्या या सत्कार समारंभाला रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, मुंबईचे सदस्य, डॉ. संजय पाटील, विभाग प्रमुख, नाट्यशास्त्र विभाग, के. एस .के. कॉलेज, बीड, श्री पी.डी. कुळकर्णी, जेष्ठ रंगकर्मी, अहमदनगर, श्री शिंगटे साहेब, जेष्ठ रंगकर्मी, अहमदनगर, डॉ. जयंत शेवतेकर, माजी विभागप्रमुख, प्रादर्शिक कला विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, डॉ. दिलीप अलोणे, वणी, श्री विश्वनाथ निळे, जळगांव आणि श्री सतिश तराळ, अमरावती यांचे स्वागत प्रादर्शिक कला विभागाचे समन्वयक श्री आर.एम.जाधव यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.

या कार्यक्रमाला वित्त व लेखा अधिकारी डॉ.नितिन कोळी, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, श्री मंगेश वरखेडे उपकुलसचिव तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरीता विभागाचे समन्वयक आर.एम. जाधव, प्रा. अमोल अढाव, डॉ. मोहन बोडे, प्रा.विद्या सावळे, प्रा. मनोज उज्जैनकर, निलेश ददगाळ, प्रविण राऊत, दिपीका रहाटे, पल्लवी सपकाळे, प्राची ढोके, अंकुश वानखडे, शुभम ठाकरे, अमेय अनसिंगकर, प्रविण खंडारे, राजू इंगोले, पारस भक्ते, संजय मकेश्वर आणि श्री कोंडे यांनी परीश्रम घेतलेत.

## मादनी जंगलात तरुणीची प्रेम प्रकरणातून हत्या

**साहसिक वृत्त / १० जुलै**

**यवतमाळ :** शहरालगतच्या बोरगाव डॅम परिसरातील मादनी जंगलात मुलीचा गळफास लावलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. सुरुवातील या मुलीची ओळख पटत नव्हती. ग्रामीण पोलिसांनी तिच्या पालकांचा शोध घेऊन ओळख पटविली. तिचा मृतदेह कुजल्याने शवचिकित्सा अहवाल येण्यास वेळ लागला. या अहवालानुसार त्या मुलीचा गळा आवळून खून झाल्याचे पुढे आले. याच दिशेने ग्रामीण पोलिसांनी तपास सुरू केला. मात्र या प्रकरणात तळेगाव दशासर ता. चांदूर रेल्वे येथे अपहरणाचा गुन्हा दाखल असल्याने खुनाचा तपासही तळेगाव पोलिसांकडे देण्यात आला. त्या मुलीची प्रेम प्रकरणातून हत्या झाल्याचे निष्पन्न झाले असून एका आरोपीला अटक केली आहे.

अमर पांडुरंग राऊत रा. येरड बाजार ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती असे आरोपीचे नाव आहे. त्याने ३ जुलै रोजी मुलीला सोबत घेतले. नंतर तिला दुचाकीवरून मादनी जंगलात आणले. तिथे तिच्यासोबत वाद घातला. माझ्यासह इतर किती मुलांबरोबर प्रेमसंबंध आहेत, अशी विचारणा केली, यावरून वाद वाढत गेला. मुलीला मारहाण करून तिच्याच ओढणीने गळा आवळून तिचा खून केला.

त्यानंतर आत्महत्येचा देखावा तयार करण्यासाठी गळफास लावून झाडाला लटकवले. या घटनेची माहिती आरोपी अमरने लगेच फोनद्वारे आपल्या मित्राला दिली. मुलीचा मृतदेह मिळताच तळेगाव पोलिसांनी तपासाला दिशा दिली. तात्काळ आरोपी युवकाला ताब्यात घेतले. त्याने अल्पवयीन मुलीसोबत शिर्डी येथे जावून लग्न केले होते. त्यानंतर मुलीचे इतरांसोबत असलेले संबंध त्याला माहिती झाले. यातूनच हत्या केल्याची कबुली आरोपी अमर राऊत याने पोलिसांना दिली.

मुलीची हत्या करणाऱ्या आरोपीला अमर राऊत याला घेऊन अमरावती पोलिस रविवारी मादनी जंगलात पोहोचले. त्यांनी आरोपीकडून हत्येचे प्रात्यक्षिक त्याच्याकडून करवून घेतले. यावेळी अमरावती ग्रामीणचे अपर पोलिस अधीक्षक शशिकांत सातव, उपविभागीय अधिकारी सुर्यकांत जगदाळे, तळगावे ठाण्यातील सहायक निरीक्षक रामेश्वर धोंडगे,उपनिरीक्षक कपील मिश्रा यांच्यासह यवतमाळ ग्रामीण ठाण्याचे उपनिरीक्षक गोपाल उताणे उपस्थित होते.

## विवाहित पुरुषाचा प्रेयसीसोबत वारंवार बलात्कार मात्र लग्नास नकार

**साहसिक वृत्त / १० जुलै**

**अमरावती :** एका अविवाहित तरूणीला पुण्यात पळवून नेत, तिच्यासोबत 'लिव्ह इन'मध्ये राहत तिच्यावर वारंवार बलात्कार केल्याची धक्कादायक घटना दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघड झाली. याप्रकरणी दर्यापूर पोलिसांनी २३ वर्षीय पिडिताच्या तक्रारीवरून आरोपी रणजीत गजानन इंगळे (२७, रा. सांगळूदकरनगर, दर्यापूर) याच्याविरूद्ध ९ जुलै रोजी पहाटे ४ वाजताच्या सुमारास बलात्कार व अपहरणाचा गुन्हा दाखल केला. विशेष म्हणजे आरोपी रणजित हा विवाहित असून एक वर्षे वयाच्या मुलीचा पिता देखील आहे.तक्रारीनुसार, आरोपी व पिडिता हे परस्परांना ओळखत होते. सन २०१९ पासून त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. दोघांमध्ये सोशल मिडियावर व्यक्त होण्यासोबतच कॉलवर संवाद देखील बहरला. त्यातून त्याने तिला लग्नाच्या आणाभाका दिल्या. आपण लग्न करणारच आहोत, अशी बतावणी करून त्याने डिसेंबर २०१९ पासून तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर वारंवार तो तिच्यावर शारीरिक बळजबरी करू लागला. दरम्यान २०२० मध्ये आरोपी रणजीतने पिडिताला दूर ठेऊन दुसऱ्याच तरूणीशी लग्न केले. त्याने ती बाब तिच्यापासून दडवून ठेवली. काही दिवसांनी ती बाब तिला समजताच तिने आकाशपातळ एक केले.

दरम्यान आरोपी पहिलेच विवाहित असताना त्याने पिडित तरूणीला लग्नाच्या उद्देशाने पुणे येथे पळवून नेले. तेथे काही दिवस ते लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहिले. त्या मुक्कामात देखील त्याने पिडिताशी वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले. दुसरीकडे पती दुसऱ्याच तरूणीसोबत पुण्याला पळून गेल्याचे समजताच रणजीतचा त्याच्या पत्नीशी देखील कडाक्याचा वाद झाला. तर दुसरीकडे पिडिताने रणजितकडे लग्नाचा हेका धरला. मात्र त्याने लग्नास नकार दिल्याने पिडिताने शनिवारी दर्यापूर पोलीस ठाणे गाठले. आरोपी विवाहित आहे. आरोपीने आपल्याला लग्नाच्या उद्देशाने पुण्याला पळवून नेल्याची तक्रार पिडिताने नोंदविली. तिच्या तक्रारीवरून आरोपीविरूद्ध अतिप्रसंग व अपहरणाचा गुन्हा नोंदविला. आरोपीला तातडीने अटक केली जाईल.

## लग्न तोडले नाहीस तर तरुणीला मारण्याची धमकी

**साहसिक वृत्त / १० जुलै**

**अमरावती :** तू तुझे जुळलेले लग्न तोडले नाहीस, तर तुझ्या लग्नात येऊन धिंगाणा घालेन, तुझ्यासह तुझ्या पती व आईवडिलांना मारून टाकून स्वत: देखील आत्महत्या करेन, अशी गर्भित धमकी एका २२ वर्षीय उपवर तरुणीला देण्यात आली. एकतर्फी प्रेमातून दिलेल्या त्या धमकीमुळे ती तरूणी नखशिखांत हादरली. धमकीच्या त्या कॉलबाबत कुटुंबियांना सांगत तिने खल्लार पोलीस ठाणे गाठले.

याप्रकरणी खल्लार पोलिसांनी त्या तरूणीच्या तक्रारीवरून ८ जुलै रोजी रात्री १०.२० च्या सुमारास आरोपी चेतन बाळकृष्ण गवळी (२८, रा. वातोंडा) याच्याविरूध्द विनयभंग व धमकीचा गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, फिर्यादी तरूणी ही सन २०१८-१९ मध्ये महाविद्यालयात अकरावी, बारावीचे शिक्षण घेत होती. त्यावेळी आरोपी हा तिच्यासोबत बोलत होता. त्याने तिला प्रपोज सुध्दा केले होते. तेव्हा तिने आरोपीला नकार दिला होता. मला तुझ्यासोबत कोणतेही संबंध ठेवायचे नाहीत, माझ्या मागे यायचे नाही. मला त्रास दयायचे नाही, असे तिने त्याला बजावले. तरी देखील तो तिला फोन कॉल करत राहायचा.

दरम्यान, त्या तरूणीचे अलिकडे अन्य एका मुलासोबत लग्न जुळले आहे. ते आरोपी चेतनला माहित झाल्याने तो तिला वारंवार फोन करू लागला. तू तुझे लग्न तोडून माझ्यासोबत लग्न कर, असा हेका त्याने धरला आहे. ७ जुलै रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास त्याने तिला फोन करून धमकी दिली. तू जर लग्न तोडले नाहीस, तर मी तुझ्या लग्नाच्या दिवसी लग्नात येऊन तुला, तुझ्या नवऱ्याला, आईला, वडिलांना मारून टाकतो, अशी धमकी दिली. त्याने त्या गर्भित धमकीसह आत्महत्या करण्याचा इशारा तिला दिला.

त्यामुळे ती प्रचंड घाबरली. लग्नात विघ्न नको, म्हणून तिने पोलीस ठाणे गाठले.

## सरकारच्या फसव्या योजनांची चर्चा बांधावर न्या-उद्धव ठाकरे



*** भ्रष्टाचार करा अन् भाजपात या, अशी नवी रणनीती झाली आहे सुरू**
*** भाजपला सत्तेची मस्ती चढली आहे, पण आत्मविश्वास राहिलेला नाही**

**साहसिक वृत्त / १० जुलै**

**अमरावती :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'चाय पे चर्चा'ने काय साध्य झाले? आता त्यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या योजना कशा बोगस, फसव्या आहेत, याची चर्चा टपरी, पानठेला, सलून, एसटी, पारावर, बांधावर जेथे-तेथे आणि त्यांची पोलखोल करा, असे आवाहन माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी येथे शिवसैनिकांना केले.

संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात अमरावती, अकोला संयुक्त शिवसेना पदाधिकारी मेळाव्याला उद्धव ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर खा. अरविंद सावंत, खा. विनायक राऊत, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार नितीन देशमुख, शिवसेना नेते मिलिंद नार्वेकर, शिवसेना शिक्षक आघाडीप्रमुख ज.मो. अभ्यंकर, माजी खासदार अनंत गुढे, माजी आमदार ज्ञानेश्वर धाने, सुधीर सूर्यवंशी, शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे, प्रीती बंड, पराग गुडधे, नाना नागमोते आदी उपस्थित होते.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, मी विदर्भाच्या दौऱ्यावर येताच विरोधकांच्या पोटात गोळा उठला. मतांची भीक मागायला आल्याची टीका ते करतात. आता माझ्याकडे पक्ष नाही, चिन्ह नाही अन् बापही चोरला. मतांसाठी कुठे फिरणार? कट्टर शिवसैनिकांच्या भेटीसाठी मी आलो आहे. दौऱ्यावर असताना जागोजागी होत असलेले स्वागत बघून मी तुम्हाला देव मानू नाही तर काय, असा उल्लेख त्यांनी शिवसैनिकांचा केला. नरेंद्र मोदी जगात क्रमांक एकचे नेतृत्व आहे, तर दुसऱ्याचा पक्ष फोडण्याची गरज का पडते? अगोदर शिवसेना फोडली, आता राष्ट्रवादी कॉंग्रेस फोडली; ही वेळ का आली? भाजपला सत्तेची मस्ती चढली आहे, पण आत्मविश्वास राहिलेला नाही, अशी टीका त्यांनी केली.

मोदींनी राष्ट्रवादी कॉंग्रेसवर ७० हजार कोटींचा घोटाळ्याचा आरोप करताच अजित पवारांसह नऊ आमदार भाजपच्यासोबत गेले नि मंत्री झाले. भ्रष्टाचार करा अन् भाजपात या, अशी नवी रणनीती सुरू झाली आहे. भाजपचे केंद्र व राज्याचे नेते सकाळी उठले की, माझा जप करतात. परंतु, माझ्यासोबत शिवसैनिक असल्याने भाजप माझे काहीही वाकडे करू शकत नाही, असा टोलादेखील त्यांनी लगावला. दरम्यान लोकसभा, विधानसभा निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन ठाकरे यांनी केले.

यावेळी खा. अरविंद सावंत, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही मनोगत व्यक्त केले.

## कुख्यात गँगस्टर नीरज बवानाच्या नावावर दिली धमकी




**साहसिक वृत्त / १० जुलै**

**बुलढाणा :** पंजाब, हरयाणासह राजस्थानमध्ये दहशत असलेल्या कुख्यात गँगस्टर नीरज बवानाच्या नावावर बुलढाण्यातील एका म्युच्युअल फंड डिस्ट्रीब्युटरला कथितस्तरावर धमकावण्यात आले आहे. सोबतच घरासमोरील कारचा काच फोडून ४० लाख रुपयांची खंडणी मागितल्याचे प्रकरण ९ जुलै रोजी समोर आले आहे. याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. शहरातील केशव नगरमध्ये राहणारे म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर पंकज अरुण खर्चे (४२) यांनी या प्रकरणी रविवारी सकाळी ही तक्रार दिली आहे.

त्यानुसार ८ जुलै रोजी सायंकाळी साडे पाचच्या सुमारास त्यांना एक कॉल आला होता. त्यात ४० लाख रुपयांची मागणी करण्यात येऊन तुझी सर्व जन्मकुंडली मला माहित असल्याचे अज्ञात व्यक्तीने म्हटले आहे. पैसे दिले नाही तर गेम करून टाकील अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान पंकज खर्चे सकाळी सव्वा सहाच्या सुमाराच्या घराच्या बाहेर आले असता त्यांच्या कारची मागील काच फुटलेली दिसली. कार जवळच एक चिठ्ठी आढळली. त्यात हिंदी भाषेत मजकूर लिहिलेला होता. 'तुला फोन केला होता.

मी नीरज बवानाचा उजवा हात आहे. तीन दिवसाचा वेळ देतो. ४० लाख रुपये दे. पैसे दिले नाही तर तुझ्या घरी पत्नी आणि तुझ्या दोन मुली राहतात, अशा आशयाची धमकी देण्यात आली आहे. या प्रकारासंदर्भात पंकज खर्चे यांनी बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यावरून पोलिसांनी खंडणीसाठी धमकवल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारीनंतर बुलढाणा शहर पोलिसांनी पंकज खर्चे यांच्या निवास्थानाची पहाणी केली. सोबतच सापडलेली चिठ्टीही ताब्यात घेतली आहे. घटनेच्या अनुषंगाने पोलिस सध्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत.

यासंदर्भात बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात विचारणा केली असता तक्रारीच्या अनुषंगाने आम्ही तपास करत आहोत, प्रकरणातील तथ्य लवकच समोर येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.